**जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद**
(उपचिटणीस शाखा)
दुरध्वनी क्रमांक 02472-227301
Email ID- rdc1osmanabad@gmail.com

वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41 व कलम 51.
4. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 02.05.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी-3/सीआर-26 दि. 04.05.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 06/05/2020.

**विषयः- उस्मानाबाद जिल्हयात लॉकडाऊनचे कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे व्यवहार चालू ठेवणेबाबत.**

**आदेशः-**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 अन्वये महाराष्ट्र शासनाने कोव्हिड 19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी संपूर्ण राज्यात लॉकडाऊनचा कालावधी दिनांक 17 मे 2020 पर्यंत वाढविला आहे व लॉकडाऊनच्या कालावधीत करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्याअनुषंगाने संदर्भ क्र. 5 अन्वये या कार्यालयाने आदेश पारित केला असून जिल्ह्यामध्ये विविध आस्थापना त्यांना निश्चित केलेल्या दिवशी ठरवून दिलेल्या वेळेमध्ये चालू ठेवण्यास परवानगी दिली आहे.

ज्याअर्थी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये आडत व्यापा-यांमार्फत शेतक-यांच्या शेतमालाची खरेदी तसेच जीवनावश्यक वस्तू उदा. शेतमाल, किराणा व भुसार मालाची लिलावाद्वारे विक्री केली जात असल्याने नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा सुरळित होण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आस्थापना चालू ठेवणे आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद संदर्भ क्र. 2 अन्वये मला प्राप्त अधिकारांनुसार करोना विषाणु (COVID-19) चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता शासनाकडून करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीत **उस्मानाबाद जिल्हयातील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील सर्व आस्थापना सकाळी 7 ते सायंकाळी 7 वाजेपर्यंत चालू ठेवण्यात याव्यात** असे आदेशीत करीत आहे.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांका पासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

**(दिपा मुधोळ-मुंडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रति,**

**जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.**

**प्रत:-** 1. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन, मंत्रालय, मुंबई-32 यांना माहितीस्तव सविनय सादर.
2. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
4. INCIDENT COMMANDER तथा उपविभागीय दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
5. INCIDENT COMMANDER तथा तालुका दंडाधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
6. जिल्हा मार्केटिंग अधिकारी, उस्मानाबाद.
7. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
8. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
9. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

1/5/20

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD

Scanned by CamScanner